# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः17.07.2025** **वारःगुरुवार**

---

1. देशातील कमी उत्पादकता असलेल्या 100 जिल्ह्यांमध्ये प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजना
2. 2024-25 या वर्षासाठी आज स्वच्छ सर्वेक्षण पुरस्कार प्रदान केले जाणार
3. सहकारिता आणि रोजगार उत्सवाचं आज उद्घाटन
4. अमेरिकेतील अलास्कामध्ये भूकंपाचे जोरदार धक्के आणि
5. इंग्लंडविरुद्ध 50 षटकांच्या क्रिकेट मालिकेत भारतीय महिला क्रिकेट संघाची विजयी सुरुवात

**धनधान्य कृषी योजना**

केंद्र सरकारने प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेची घोषणा केली आहे. देशभर राबवल्या गेलेल्या आकांक्षी जिल्हा विकास कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर ही योजना आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या केंद्रिय मंत्रिमंडळ बैठकीत योजनेला मान्यता देण्यात आली. कमी उत्पादकता असलेल्या 100 जिल्ह्यांमध्ये ही योजना राबवण्यात येणार असून त्यासाठी एकंदर 24 हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. धनधान्य कृषी योजनेमुळे मागासलेल्या जिल्ह्यामधील कृषी उत्पन्न वाढवण्यास मोठी मदत होणार आहे तसंच शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढणार आहे. शेतकऱ्यांचं जीवनमान उंचवण्यासाठी केंद्र सरकारची कटिबध्दता यातून अधोरेखीत होते अशी प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योजनेबद्दल समाजमाध्यमावरील संदेशात दिली आहे.

अपारंपरिक उर्जा क्षेत्राच्या विकासासाठी राष्ट्रीय औष्णिक उर्जा महामंडळ अर्थात NTPC Ltd च्या उपकंपन्यांमध्ये 20 हजार कोटी रुपयांच्या गुंतवणूकीला केंद्रिय मंत्रिमंडळाने काल मान्यता दिली. यामुळे हरित हायड्रोजन, पवन उर्जा, सौर उर्जा आदी श्रेत्रांचा विकास होणार आहे. हे पाऊल अक्षय ऊर्जा क्षमता मजबूत करण्याच्या भारताच्या प्रयत्नांना चालना देणारे आहे आणि स्थानिक नागरिकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या रोजगाराच्या संधी निर्माण होतील. असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

2032 पर्यंत 62 गिगा वॅट अक्षय ऊर्जा क्षमता साध्य करण्यासाठी 20 हजार कोटी रुपयांपर्यंतच्या पूर्वी मंजूर केलेल्या सात हजार 500 कोटी रुपयांच्या निर्धारित मर्यादेपेक्षा हे प्रमाण जास्त आहे. असं केंद्रिय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विणी वैष्णव यांनी सांगितल. अंतराळवीर शुभांशू शुक्लाच्या यशस्वी अंतराळ प्रवासानंतर त्यांचं आणि त्यांच्या सहकाऱ्यांचं अभिनंदन करणारा प्रस्तावही बैठकीत मान्य करण्यात आला.

**राष्ट्रपती**

2024-25 या वर्षासाठीचे स्वच्छ सर्वेक्षण पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज नवी दिल्ली प्रदान केले जातील. स्वच्छ भारत मिशन-शहरी अंतर्गत स्वच्छतेसाठी राबवण्यात आलेल्या उपक्रमाअंतर्गत सर्वात स्वच्छ शहरांचा गौरव केला जाईल. यावर्षी, चार श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान केले जातील सुपर स्वच्छ  शहरे आणि लोकसंख्येच्या आधारे पाच श्रेणींमध्ये तीन स्वच्छ शहरांचा समावेश करण्यात आला आहे. यावर्षी एकंदर ७८ पुरस्कार प्रदान केले जातील. अशी माहिती गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयानं दिली आहे.

**मुख्यमंत्री-मुंबई**

मुस्कान आणि शोध मोहिमांद्वारे महाराष्ट्रातील हजारो बेपत्ता महिला आणि बालकांचा शोध घेण्यात यश आल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाला सांगितलं. आमदार सुनील शिंदे यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. बेपत्ता प्रकरणांच्या तपासासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात मिसिंग सेल स्थापन करण्यात आली असून अतिरिक्त पोलीस महासंचालक पदाच्या महिला अधिकाऱ्याकडं याची जबाबदारी असेल, असंही फडणवीस म्हणाले. केंद्र सरकारच्या Missing Portalसोबत सर्व राज्यांना जोडण्यात आलं असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**अमित शहा**

सहकारिता आणि रोजगार उत्सव या कार्यक्रमांत सहभागी होण्यासाठी केंद्रिय सहकारमंत्री अमित शहा आज राजस्थानमधील जयपूरनजिक दादिया इथं जाणार आहेत. यावेळी 8 हजार नवनियुक्त उमेदवारांना नियुक्त पत्र त्यांच्या हस्ते प्रदान केले जाईल तसंच विविध योजनांच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे आणि धनादेश वितरित करतील. विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांचे उद्घाटन शहा यांच्या हस्ते होणार आहे. ते जगातील सर्वात मोठ्या धान्य साठवणूक योजनेअंतर्गत बांधलेल्या 24 गोदामांचे आणि श्रीअन्न योजनेच्या प्रचारासाठी 64 तृणधान्य दुकानांचे उद्घाटन करतील.

**अलास्का**

अमेरिकेतील अलास्कामध्ये आज भुकंपाचे जोरदार धक्के जाणवले. 7 पुर्णांक 3 रिख्टर क्षमतेचा हा भुकंप होता. भूकंपाचे केंद्र अलास्कातील सँड पॉइंटपासून 89 किलोमीटर दक्षिणेस होते. अँकरेज आणि जुनोपर्यंत पसरलेल्या प्रदेशात भुकंपानंतरचे धक्के जाणवत आहेत.  अद्याप कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. अलास्का भूकंप केंद्राचे संचालक आणि भूकंपशास्त्रज्ञ मायकेल वेस्ट यांनी सांगितले की, तीव्र धक्के कमी होत आहेत आणि त्सुनामीचा कोणताही इशारा नाही. इकडे हरियाणातील रोहतक जिल्ह्यात आज पहाटे 3 पूर्णांक 3 रिख्टर क्षमतेचा भूकंपाचा धक्का बसला.

**भारत-अमेरिका**

भारत आणि अमेरिका यांच्यात अंतरिम व्यापारासाठी सुरू असलेल्या वाटाघाटी लवकरच पूर्ण होऊ शकतात असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. चर्चा योग्य दिशेने सुरू आहेत. प्रस्तावित करारामुळे अमेरिका आणि इंडोनेशियामधील व्यापार कराराच्या अनुषंगाने अमेरिकन कंपन्यांना भारतीय बाजारपेठेत अधिक संधी मिळू शकेल असं ट्रंप यांनी म्हटलं आहे. इंडोनेशियामध्ये अमेरिकेला पूर्ण क्षमतेने व्यापार करता येतो आणि भारताबाबतही त्याच मार्गाने काम सुरु आहे. असंही ते म्हणाले.

**रशिया-युक्रेन**

रशियाने युक्रेनवर 400 ड्रोन्सचा वापर करुन हल्ले केले यामध्ये एका बॅलिस्टिक क्षेपणास्त्राच्या हल्ल्याचाही सामवेश आहे. अशी माहिती युक्रेनियन हवाई दलानं दिली आहे. या हल्ल्यात खार्किव, क्रायवी रिह आणि विनितसिया यासारख्या प्रमुख शहरांना लक्ष्य करण्यात आले, ज्यामुळे ऊर्जा पायाभूत सुविधांचे नुकसान झालं असून किमान 15 लोक जखमी झाले. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्होलोडिमिर झेलेन्स्की यांनी या हल्ल्याची पुष्टी केली आहे.

**इस्त्रायल**

इस्त्रायलनं सिरीयातील सैन्याच्या मुख्यालयावर काल हल्ला केला. ड्रुझ नागरिकांना असलेल्या धोक्यांचा हवाला देत इस्त्रायलने दमास्कसमधील या मुख्यालयावर हल्ला केला. सीरियन ड्रुझ आणि बेदुइन्समध्ये वांशिक हिंसाचार वाढत असताना हा हल्ला झाल्याची बातमी सिरीयातील प्रसारमाध्यमांनी दिली आहे. इस्त्रायलीमधील शास पक्षाने बेंजामिन नेतान्याहू यांच्या नेतृत्वाखालील युती सरकार सोडत असल्याची घोषणा केली आहे. इस्त्रायली प्रसारमाध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, धार्मिक

विचारसरणी असलेल्या विद्यार्थ्यांना भविष्यात लष्करी भरतीतून सूट देण्यास सरकाने हमी न दिल्याच्या निषेधार्थ शास पक्षाने सरकार सोडले आहे. युनायटेड टोराह ज्यूडाइझम या आणखी पक्षाने त्याच मुद्द्यावर सरकारमधून राजीनामा दिल्यानंतर एका दिवसात शास यांनी युतीला सोडचिठ्ठी दिली आहे.

**<u>अधिवेशन</u>**

येत्या सोमवारपासून सुरु होत असलेल्या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं येत्या रविवारी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. दोनही सभागृहांचं काम सुरळीत चालावं यासाठी सर्व पक्षांनी सहकार्य करावं अशी केंद्र सरकारची अपेक्षा आहे. पुढील महिन्याच्या 21 तारखेपर्यंत अधिवेशन चालेल. अनेक महत्वाच्या विधेयकांवर या कालावधीत चर्चा अपेक्षित आहे.

**<u>अश्विनी-वैष्णव</u>**

देशातील दहा लाख नागरिकांना कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रशिक्षण मोफत दिले जाईल आणि ग्रामीण पातळीवरील उद्योजकांना प्राधान्य दिलं जाईल अशी घोषणा इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल केली. डिजिटल इंडियाच्या 10 वर्षापूर्तीनिमित्त नवी दिल्ली इथं आयोजित एकत्रित सेवा केंद्र अर्थात 'CSC दिवस' या कार्यक्रमात वैष्णव यांनी ही घोषणा केली. देशभरातील ग्रामीण पातळीवरील उद्योजकांनी डिजिटल इंडियाचे फायदे प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवून एक उल्लेखनीय उदाहरण जगासमोर ठेवले आहे. CSC देशातील जवळपास 90 टक्के गावांपर्यंत पोहोचले आहे. सर्व ग्रामीण स्तरावरील उद्योजकांनी नागरिकांना रेल्वेसंदर्भातील सेवा देण्यास सुरुवात करण्याचे आवाहनही त्यांनी केलं.

**<u>क्रिकेट</u>**

भारतीय महिला क्रिकेट संघानं इंग्लंडविरुद्ध पन्नास षटकांचा पहिला सामना काल साऊदॅम्प्टन इथं 4 गडी राखून जिंकला आणि तीन सामन्यांच्या या मालिकेत आघाडी घेतली. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडनं निर्धारित 50 षटकात 6 बाद 258 धावा केल्या. त्यामध्ये सोफिया डंकलेनं 83 धावांचं योगदान दिलं. भारताच्या क्रांती गौड आणि स्नेह राणानं प्रत्येक दोन गडी बाद केले. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वातील भारतीय संघानं दहा चेंडू शिल्लक असताना विजयाचं लक्ष्य गाठलं. दीप्ति शर्मानं नाबाद 62 धावा करुन या विजयाला आकार दिल्याबद्दल तिला सामनावीर घोषित करण्यात आलं. दुसरा सामना शनिवारी लंडनमध्ये लॉर्ड्स मैदानावर होणार आहे.

**<u>हवामान</u>**

पुढील दोन दिवसांत केरळ, माहे आणि कर्नाटकमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये जोरदार पाऊस पडेल. तर आंध्र प्रदेश, केरळ, माहे आणि लक्षद्वीपमध्ये काही ठिकाणी जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.